# प्रेस नोट

नाशिक
दिनांक २३/०८/२०१८

**आलोसे राजेंद्र यादवराव भामरे, पो.हवालदार, ब.नं.१६१५, नेमणुक वाडीवऱ्हे पोलीस ठाणे, नाशिक गामीण, ता.जि.नाशिक यांना भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये शिक्षा झाले बाबत**

तक्रारदार यांचे विरुध्द वाडीवऱ्हे पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या अदखलपात्र गुन्हयात तक्रारदार यांचेवर प्रतिबंधक कारवाई व अटक न करण्यासाठी आलोसे राजेंद्र यादवराव भामरे, पो.हवालदार, ब.नं.१६१५, नेमणुक वाडीवऱ्हे पोलीस ठाणे, नाशिक गामीण यांनी दि. १८.५.२०१० रोजी ५०००/—रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाप्रवि. नाशिक कार्यालयात तक्रार दिल्याने तक्रारदार यांचे तक्रारीवरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला. सापळा कारवाई दरम्यान आलोसे राजेंद्र यादवराव भामरे, पोलीस हवालदार यांनी दि. १८.५.२०१० रोजी १३.२५ वाजता तक्रारदार यांना ५,०००/— रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम वाडीवऱ्हे पोलीस ठाणे विश्रामगृहात स्विकारतांना त्यांना रंगेहात पकडून त्यांचेविरुध्द वाडीवऱ्हे पोलीस ठाणे गुरनं. ३००३/२०१० भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७,१३(१)(ड) सह १३(२)प्रमाणे दि. १८.५.२०१० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करुन राजेंद्र यादवराव भामरे यांचेविरुध्द मा.नाशिक न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते.

सदर खटल्याचा दिनांक २१.८.२०१८ रोजी मा. श्री. एस.सी.खटी सो.विशेष जिल्हा व सत्र न्यायाधिश, नाशिक यांनी निकाल दिला असून त्यात आलोसे राजेंद्र यादवराव भामरे, पो.हवालदार, ब.नं.१६१५, नेमणुक वाडीवऱ्हे पोलीस ठाणे, नाशिक गामीण यांना दोषी ठरवुन भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा कलम ७ नुसार ६ महिने साधा कारावास व १०००/—रुपये दंड, दंड न भरल्यास १ महिना साधा कारावास व कलम १३ नुसार २ वर्ष साधा कारावास व १०००/— रुपये दंड, दंड न भरल्यास १ महिना साधा कारावास अशी शिक्षा ठोठावलेली आहे. सदर खटल्याचे कामकाज सरकारपक्षातर्फे श्री. कल्पक निंबाळकर, अति. सरकारी अभियोक्ता, नाशिक यांनी पाहिलेले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक तर्फे नागरीकांना आवाहन करण्यांत येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रातील कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक तर्फे नागरीकांना आवाहन करण्यांत येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रातील कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल क्रमांक व दूरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी **लॅंडलाईन ते लॅन्डलाईन व मोबाईल ते लॅन्डलाईन अशी टोल फ्री नंबर १०६४** ची सेवा सुरु करण्यांत आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीसंबंधी व करावयाच्या तक्रारीसंबंधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अनं | युनिटचे नांव | दूरध्वनी क्रमांक | टोल फ्री नंबर |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३—२५७५६२८, २५७८२३० | **१०६४** |
| २ | अहमदनगर | ०२४१—२४२३६७७ | **१०६४** |
| ३ | धुळे | ०२५६२—२३४०२० | **१०६४** |
| ४ | नंदूरबार | ०२५६४—२३०००९ | **१०६४** |
| ५ | जळगांव | ०२५७—२२३५४७७ | **१०६४** |

(स्वाक्षरी)
**( विश्वजीत जाधव )**
पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ना.प.नाशिक करीता